## मराठी (प्रथम भाषा) कुमारभारती इयत्ता–दहावी

### ◈ इयत्ता दहावीच्या प्रस्तावित आराखड्यानुसार नमुना कृतिपत्रिका क्र.२

**वेळ– ३ तास** **एकूण गुण–१००**

### कृतिपत्रिकेसाठी सूचना

(१) सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.
(२) आकृत्या पेननेच काढाव्यात.
(३) उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना, निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही. तसेच या कृती लिहून घेऊ नयेत.
(४) विभाग ५– उपयोजित लेखन प्र.५ (अ) (२) सारांशलेखन या घटकासाठी गद्य विभागातील प्र.१ (इ) अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावयाचा आहे.
(५) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

### विभाग १ गद्य

**पठित गद्य**

प्र. १. **(अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१)खालील शब्दसमूहांचा तुम्हाला कळलेला अर्थ लिहा.** २

(i) पुस्तकाच्या पानांत डोक्याचं खादय असत. –

(ii) एकानेतरी लिहिलेलं पुस्तक आपल्या शाळेच्या ग्रंथालयात दिसलं पाहिजे. –

पुस्तकातल्या पानांत डोक्याचं खाद्य असतं. झाडाच्या पानांत झाड जगवण्याचं बळ असतं. दोन्ही पानं महत्त्वाची असतात. दोन्हीपण बघितली पाहिजेत प्रेमाने. माणसं कितीही मोठी झाली, तरी त्यांची सावली कुणाला कामी येत नाही; पण झाडं मोठी झाली, तर कित्येक पिढ्यांना त्यांची सावली उपयोगी असते. तुमच्या घरापुढे कोणती गाडी आहे याच्यापेक्षा तुमच्या घराभोवती किती झाडी आहे, हे जास्त महत्त्वाचं आहे. तुम्ही किती श्रीमंत आहात हे दाखवायचं असेल, तर गाडी आवश्यक आहे; पण तुमचा देश किती श्रीमंत आहे हे दाखवायचं असेल, तर झाडी खूप आवश्यक आहे. झाडांचं वेड असणारी लाखो मुलं गरजेची आहेत.

खूप पैसे कमवायचे आणि निसर्ग बघायला दुसऱ्या देशात जायचं स्वप्न असतं लोकांचं; पण आपल्या देशातला निसर्ग समृद्ध करणारी माणसं हवीत. तुमच्यापैकी खूप जण परदेशात जाणार आहात. तुमच्यापैकी एकजण तरी सवाई गंधर्व महोत्सवात गाताना दिसलं पाहिजे. परीक्षेत पहिले आलात तर शाळेच्या भिंतीवर तुमचं नाव असेल; पण तुमच्यापैकी एकानेतरी लिहिलेलं पुस्तक आपल्या शाळेच्या ग्रंथालयात दिसलं पाहिजे. तुम्ही जगातल्या मोठमोठ्या हॉटेलमध्ये जाणार आहात; पण तुमच्यापैकी एकाच्या तरी शेतात हुरडा खायला यायचंय मला. आपल्या पूर्वजांनी वेरूळ अजिंठा बनवलाय. जगभरचे लोक बघायला येतात. तुम्ही असंच नवीन काहीतरी भव्यदिव्य बनवून दाखवाल याची मला खात्री आहे.

(२) **तक्ता पूर्ण करा.** १

i)

| सामान्य व्यक्तीची श्रीमंती | देशाची श्रीमंती |
|---|---|
| | |

ii) लेखकांना अपेक्षित असलेले छंद/व्यवसाय १

↓ ________ ↓ ________

(३) **व्याकरण** २

खालील शब्दांचा संधिविग्रह करा.

i)

| शब्द | संधिविग्रह |
|---|---|
| i) ग्रंथालय<br>ii) महोत्सव | ............+...........<br>............+.......... |

(४) लेखकांनी उताऱ्यात व्यक्त केलेला पर्यावरणविषयक विचार तुमच्या शब्दांत व्यक्त करा. २

**प्र.१ (आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** २

**(१) चौकटी पूर्ण करा.**

i) माणसाची गरजेची गोष्ट → ________

ii) समाजातून हरवलेली गोष्ट → ________

iii) दुसऱ्याच्या उपयोगी पडणे म्हणजे → ________

iv) संतांना नको असलेली वृत्ती → ________

सर्व संतांनी मागितलेले मागणे म्हणजे मानवाच्या कल्याणासाठी आणि प्रगतीसाठी केलेली चिरंजीव प्रार्थना आहे. ही प्रार्थना मानवतेची पूजा करणारी आहे. संतांनी माणसाला महत्त्व दिले. माणूस आदर्श व्हावा, त्याने सुसंस्कारांची जोपासना करावी. कुणालाही त्रास देऊ नये, एकोप्याने राहावे. माणूस कधीही एकाकी राहू शकत नाही. त्याला संवादाची नितांत गरज असते, म्हणून माणसाने कुणालाही दुखवता कामा नये. शक्यतो दुसऱ्याच्या उपयोगी पडणे, ही खरी मानवता आहे. संतांनी ही मानवता आवर्जून शिकवली. तशी त्यांनी आचरणातही आणली.

आजच्या विज्ञानयुगात विज्ञान-तंत्रज्ञानातील संशोधनामुळे विश्व जवळ आले आहे. संत ज्ञानेश्वरांनी तेराव्या शतकात 'हे विश्वचि माझे घर आहे,' ही कल्पना केली होती याचे प्रत्यंतर आज आपण घेत आहोत. आज आपण जगात कुठेही जाऊ शकतो; पण संत ज्ञानेश्वरांना अभिप्रेत असलेला माणसामाणसांना जोडणारा जिव्हाळा आज हरवला आहे. तो जपण्यासाठी मन सुसंस्कृत असायला हवे. नाहीतर, राक्षसी वृत्ती निर्माण होते. ती संतांना नको आहे. चांगल्या मनाने निर्माण केलेल्या कृती जगात महत्त्वपूर्ण ठरतात. विज्ञानातील चांगले प्रकल्प समृद्धी आणतात; पण सुंदर मने ही राष्ट्राची श्रीमंती वाढवतात. संतांनी याकडे लक्ष वेधले आहे.

**(२) संतांना आदर्श माणसाकडून अपेक्षित असलेल्या कृती** २

↓ ________ ↓ ________ ↓ ________ ↓ ________

**(३) व्याकरण**

खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांबद्दल खालील माहिती लिहून तक्ता पूर्ण करा.

विज्ञानातील चांगले प्रकल्प समृद्धी आणतात, पण सुंदर मने ही राष्ट्राची श्रीमंती वाढवतात. २

| दिलेला शब्द | शब्दाची जात | शब्दाचा उपप्रकार |
|---|---|---|
| i) चांगले | विशेषण | ________ |
| ii) प्रकल्प | नाम | ________ |
| iii) पण | ________ | उभयान्वयी |
| iv) वाढवतात | ________ | सकर्मक |

(४) समाजातील जिव्हाळा हरवल्या बद्दलची व्यक्त केलेली खंत व त्याचा परिणाम तुमच्या शब्दांत लिहा. २

**प्र.१ (इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** २

**(१) चौकटी पूर्ण करा.**

i) महापुरुषांना सहन कराव्या लागणाऱ्यार गोष्टी

↓ ________ ↓ ________ ↓ ________ ↓ ________

ii) सहनशक्तीची गरज

↓ ________ ↓ ________

सहनशीलता हा एक सद्गुण आहे. त्याला भावनिक संयम असेही म्हणता येईल. मनाविरुद्ध थोडे काही घडले की अस्वस्थ होणे ही एक प्रकारची मानसिक दुर्बलता आहे. काही व्यक्ती आपला विरोध तडकाफडकी नोंदवून मोकळ्या होतात. घरात कोणाकडून चहाचा कप पडला, सांडला की घर डोक्यावर घेणारी माणसे त्याच घरात राहात असतात. सहन करणे म्हणजे निष्काळजी किंवा निष्क्रिय राहाणे नव्हे. मनाचा तोल जाऊ न देता आपल्या शक्तीचा अपव्यय टाळणे व ती सुरक्षित ठेवणे होय. महापुरुषांना प्रतारणा, उपमर्द, विरोध, निंदा सहन करावी लागते. पराभव पत्करुन शांत राहावे लागते. त्यांना ते जमते. सामान्य माणसांना तीच दुःखे सौम्य स्वरुपात अनुभवावी लागतात. त्यांनी ती सहन करण्याचा सराव केला पाहिजे. ज्यांची सहनशीलता कमी पडते. त्यांच्या हातून अनेक चुकीच्या प्रतिक्रिया घडतात. विशेषतः आपला अपमान होतो तेव्हा आपणास चीड येते. अपमान सहन करुन शांतपणे आपला तोल सावरणे हे आपले कर्तव्य असते. प्रतिक्रियांची तीव्रता आणि स्वैरता टाळणे व समय पाहून स्वतःला सावरुन जे शक्य ते करणे त्यात सहनशीलतेचे सार आहे. समाजजीवनात सतत सहनशील असावे लागते. या जगात प्रत्येकाला बरेच काही सहन करावे लागते. ते शांतपणे सहन करता आले पाहिजे. हे जग सुंदर करण्यासाठी आणि जीवन सुखी करण्यासाठी सहनशील होता आले पाहिजे.

**(२) हे केव्हा घडते ते लिहा.** १

1) i) हातून चुकीच्या प्रतिक्रिया घडतात – ________

ii) आपल्याला चीड येते – ________

**(२) खालील चौकट पूर्ण करा.** १

i) सहनशीलता नसलेल्या व्यक्तींच्या कोणत्याही दोन कृती

→ __________ → __________

**(३) व्याकरण –**

(i) वाक्यातील अधोरेखित शब्दांचे विरुद्धार्थी शब्द वापरुन वाक्य पुन्हा लिहा. १

(अ) सहनशीलता हा एक सद्गुण आहे.

(आ) सहन करणे म्हणजे निष्क्रिय राहणे नाही.

(ii) खालील नामांचा उपक्रार लिहा. १

(अ) सहनशीलता – __________

(आ) निंदा – __________

**(४) स्वमत –** कुटुंबात सहनशीलता नसलेल्या व्यक्तींचा तुम्हाला आलेला अनुभव तुमच्या शब्दांत लिहा. २

## विभाग 2 : पद्य

**प्र.२ (अ) खालील आकृती पूर्ण करा.**

**(1) खालील तक्ता पूर्ण करा.** २

कवींनी मनाला करायला सांगितलेल्या क्रिया

→ __________
→ __________
→ __________
→ __________

सुसंगति सदा घडो; सुजनवाक्य कानीं पडो;
कलंक मतिचा झडो; विषय सर्वथा नावडो;
सदंघ्रिकमळीं दडो; मुरडितां हटानें अडो;
वियोग घडतां रडो; मन भवच्चरित्रीं जडो ।।

न निश्चय कधीं ढळो; कुजनविघ्नबाधा टळो;
न चित्त भजनीं चळो; मति सदुक्तमार्गीं वळो; ।
स्वतत्त्व हृदया कळो; दुरभिमान सारा गळो;
पुन्हां न मन हें मळो; दुरित आत्मबोधें जळो ।।

मुखीं हरि! वसो तुझी कुशलधामनामावली,
क्षणांत पुरवील जी सकलकामना मावली; ।
कृपा करिशि तूं जगत्रयनिवास दासावरी,
तशी प्रगट हे निजाश्रितजनां सदा सांवरी ।।

**(२)** ‘कुशलधामनामावली मावली’ या कवींच्या कल्पनेतील कुशलधामनामावली व मावली यांच्यातील साम्य स्पष्ट करा. २
स्पष्ट करा.

| कुशलधामनामावली | मावली (माऊली) |
|---|---|
| i) ______ | i) ______ |
| ii) ______ | ii) ______ |

**(३) काव्यसौंदर्य** २

‘स्वतत्त्व हृदया कळो; दुरभिमान सारा गळो;
पुन्हां न मन हें मळो; दुरित आत्मबोधें जळो ।।’ या ओळींचा सरळ अर्थ तुमच्या शब्दांत लिहा.

(४) कवींनी वर्णन केलेले सज्जनांच्या सहवासाचे व सद्‌विचारांच्या श्रवणाचे महत्त्व तुमच्या शब्दांत स्पष्ट करा. २

**प्र. २ (आ) खालील मुद्द्यांच्या आधारे कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील कृती सोडवा.** ८

कविता – १) खोद आणखी थोडेसे

२) उत्तमलक्षण

(१) प्रस्तुत कवितेचे कवी / कवयित्री – (१)

(२) कवितेचा काव्यसंग्रह – (१)

(३) कवितेचा विषय – (१)

(४) कवितेतून व्यक्त होणारा भाव – (१)

(५) कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण (२)

(६) कवितेची मध्यवर्ती कल्पना – (२)

**(इ) दिलेल्या काव्यपंक्तींचे रसग्रहण करा.** ४

आज पन्नास वर्षांनी अनुभवतोय
सूर्यफुले तुझा ध्यास घेतायत
बिगूल प्रतीक्षा करतोय
चवदार तळ्याचं पाणी, तेही आता थंड झालाय

## विभाग 3 : स्थूलवाचन

**प्र. (3) – खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** ६

१) खालील मुद्द्यांच्या आधारे एक परिच्छेद तयार करा.

i) व्यत्पत्तीकोशाचे कार्य

ii) शब्द तयार होण्याचे विविध प्रकार

२) मधूशी मैत्री करायला तुम्हाला आवडेल का ? तुमचे मत लिहा.

३) 'पतिनिधनानंतर आपणं सैन्यात भरती व्हायचं' या स्वाती महाडिक यांच्या निर्धारातून समाजाला कोणता संदेश मिळतो, तो तुमच्या शब्दांत लिहा.

## विभाग ४ –१ व्याकरण

**प्र.४ –अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती**

**१) समास –**

**खालील वाक्यातील सामासिक शब्द ओळखा व त्या शब्दाच्या समासाचे नाव लिहा.** २

१) राजू स्वतःच्या मालाची जाहिरात करण्यास घरोघर फिरला.

२) या सप्ताहात शरदरावांची फारच धावपळ झाली.

| सामासिक शब्द | समासाचे नाव |
|---|---|
| i) ______________<br>ii) ______________ | i) ______________<br>ii) ______________ |

**(२) अलंकार –**

**खालील उदाहरण वाचून कृती सोडवा.** २

झाड बसते ध्यानस्थ ऋषिसारखं मौन व्रत धारण करुन तपश्चर्या करत ...........

i) प्रस्तुत ओळीतील अचेतन गोष्ट – __________

ii) प्रस्तुत ओळीतील दोन मानवी कृती – १. __________ २. __________

iii) प्रस्तुत ओळीतील अलंकार – __________

**(३) खालील काव्यपंक्तीचा लघू – गुरु क्रम लिहा.** १

रघूनायका मागणे हेचि आता ।

**(४) शब्दसिद्धी –**

**बाजूच्या आकृतीतील शब्दांचे वर्गीकरण करा.** २

दंगामस्ती टाकाऊ
भांडखोर आहार

| प्रत्ययघटित | उपसर्गघटित | अभ्यस्त |
|---|---|---|
| | | |

**(५) सामान्यरुप –**

खालील शब्दसमूहातील शब्दांची योग्य सामान्यरुपे निवडून चौकटीत लिहा. १

i) भूगोलची वही / भूगोलाची वाही – ☐

ii) कोकराचे पाय / कोकरुचे पाय – ☐

iii) इंदिरेचे पुस्तक / इंदिराचे पुस्तक – ☐

iv) पेनने लिही / पेनाने लिही – ☐

**(६) वाक्प्रचार – वाक्प्रचाराचा योग्य अर्थ शोधून लिहा.** २

(१) शिरोधार्य मानणे –

(अ) डोक्यावर घेणे (आ) महत्त्व देणे (इ) डोके खाजवणे

(२) कंठस्नान घालणे –

(अ) कंठ स्वच्छ करणे (आ) कंठात गाणे असणे (इ) ठार मारणे

(३) पारख करणे –

(अ) तपासणी करणे (आ) परीक्षण करणे (इ) निरीक्षण करणे

(४) मुहूर्तमेढ रोवणे –

(अ) एखाद्या गोष्टीचा आरंभ करणे (आ) एखाद्या गोष्टीचा शेवट करणे

(इ) एखादी गोष्ट मुहूर्तावर करणे

**(आ) भाषिक घटकांवर आधारित कृती –**

**(१) शब्दसंपत्ती –**

(१) खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा. १

(अ) दुसऱ्यावर अवलंबून असलेला – __________

(आ) एक आठवड्यातून प्रसिद्ध होणारे – __________

**(२) खालील शब्दाचे दोन अर्थ लिहा.** **१**

______ ← रजनी → ______

**(३) गटात न बसणार शब्द शोधा.** १

(अ) खोदाई, लढाई, शिष्टाई, मुंबई

(आ) हरीहर, हररोज, हरघडी, हरसाल

**(४) 'आकलनकृती' – या शब्दातील आकलन आणि कृती हे दोन शब्द सोडून इतर दोन शब्द लिहा.** १

__________ __________

**(२) लेखननियामांनुसार लेखन**

**(i) अचूक शब्द ओळखा –** १

(अ) पुर्नविचार / पुनरविचार / पूनर्विचार / पुनर्विचार

(आ) व्यक्तीमत्त्व / व्यक्तिमत्व / व्यक्तिमत्त्व / व्यक्तीमत्व

(ii) खालील वाक्य लेखननियमांनुसार लिहा. १

१) पतीनिधनाचे असीम दुःख बाजुला ठेवले.

**(३) विरामचिन्हे –** १

(i) 'उद्या कोकिळेचं 'कुहू' ऐकू येईल का ? बघू हं !'
वरील वाक्यातील विरामचिन्हे खाली लिहून त्यांची नावे लिहा.

| **विरामचिन्हे** | **नावे** |
|---|---|
| i) __________ | i) __________ |
| ii) __________ | ii) __________ |

(ii) खाली विरामचिन्ह केव्हा वापराल ते दिलेले आहे. त्या आशयानुसार कोणते विरामचिन्ह वापराल ते विरामचिन्ह काढा. १

| आशय | चिन्ह |
|---|---|
| (अ) बोलणाऱ्याच्या तोंडचे शब्द दाखवण्याकरिता – | ______ |
| (आ) दोन छोटी वाक्ये उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली असल्यास – | ______ |

**(४) पारिभाषिक शब्द –** १

खालील शब्दांना प्रचलित मराठी भाषेतील शब्द लिहा.

(i) Valuation – __________

(ii) Threapy – __________

**(५) खालील शब्द अकारविल्हे लावा.** १

अंबरिश, ओंकार, अवनी, अर्णव

## विभाग – ५ उपयोजित लेखन

**प्र. ५ (अ) खालील कृती सोडवा.**

(१) पत्रलेखन ५

आरोग्यम् धनसम्पदा

'संकल्प' संस्थेद्वारे शिबिराचे आयोजन

आरोग्य शिबिर

विविध शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीचा विनामूल्य उपक्रम

विशेष – i) चष्मे व काही औषधे विनामूल्य

ii) तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा उपलब्ध

प्राथमिक तपासणी व सल्ला

सर्व विद्यार्थ्यांची तपासणी

शाळेचा प्रमुख या नात्याने तुमच्या शाळेत 5 ते 10 नोव्हें या कालावधीत शिबिर घेण्याची विनंती करा.

किंवा

शाळेचा प्रमुख या नात्याने उत्तम उपक्रम राबविण्याबाबत संस्था प्रमुखांचे अभिनंदन करा.

(2) सारांशलेखन – ५

विभाग – १ गद्य विभागातील प्र.१ इ मधील अपठित उताऱ्याचा एक तृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

**प्र. ५. (आ) –**

**(1) बातमी लेखन –** ६

खालील विषयावर बातमी तयार करा. (50 ते 60 शब्द)

तुमच्या शाळेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचा उद्‌घाटन समारंभ माननीय मुख्यमंत्र्यांच्या हस्ते संपन्न

कथालेखन (80 ते 100 शब्द) ६


**(२) खालील अपूर्ण कथा पूर्ण करा.**

शाळेची टण्टण् घंटा वाजली. गडबडीने सर्व विद्यार्थी बाहेर पडू लागली. वरच्या मजल्यावरुन श्रेया आणि सानिकाही धावतच बाहेर पडल्या. सीटी बसमध्ये जागा मिळत नाही म्हणून भराभर चालत होत्या. शेवटी बसथांब्याजवळ पोहोचल्या. पटापट प्रवासी चढलेत. श्रेया व सानिकाला जागा मिळाली. बस चालू झाली. गर्दीत एक आजोबा उभे होते. श्रेयाने पटकन उठून आजोबांना जागा दिली. दोन चौक पार करुन बस पुढे चालू लागली, पण थोड्याच वेळात बस थांबली. सगळ्यांना वाटले थांबली असेल थांब्यावर. पण तो थांबा नव्हता समोर प्रचंड गर्दी जमली होती बरीच वाहने अडली होती. सगळे एकमेकांना बस थांबण्याचे कारण विचारु लागले अन् ..........................................
........................................................................................................................................
........................................................................................................................................

**(इ) लेखन कौशल्य –** ८

खालील लेखन प्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा. (शब्दमर्यादा – 100 ते 120 शब्द)

**वैचारिक लेखन**




वरील मुद्द्यांचा आधार घेऊन दिलेल्या विषयावर निबंधलेखन करा.

**आत्मकथन –**

